महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**७६५ के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग एकतुनी**
गट क्र.२६४, रोहिलागड फाटा, एकतुनी, ता.पैठण, जिल्हा औरंगाबाद
फोन नंबर (का) ८५५४९९५२६५, ई मेल आय डी- ee2160@mahatransco.in

जा.क्र.का.अ./७६५ के.व्ही./ग्रकेवि/एकतुनी/मासं/ 313 दिनांक - 25 जुलै 2022

**शिकाऊ उमेदवार कायदा,१९६१ अंतर्गत वर्ष २०२२-२०२३ करीता ७६५ के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग एकतुनी तिसऱ्या फेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी.**

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री (ELECTRICIAN) या व्यवसायातुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांकडुन (ONLINE) अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक ३१.०१.२०२२ होती.

२. उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार करण्यात आली असुन उमेदवारांची निवड यादी त्यांना एस.एस.सी व आ.टी.आय विजतंत्री (ELECTRICIAN) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर तसेच त्यांनी त्यांच्या अर्ज मध्ये दर्शविलेल्या जात व इतर माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या उमेदवाराने एका पेक्षा जास्त ठिकाणी अर्ज केले आहेत व त्याची निवड एका पेक्षा जास्त ठिकाणी होत असल्यास जाहिरातीत नमुद असल्याप्रमाणे त्याची निवड त्याच्या अर्जावर नमुद पत्त्यानुसार त्या विभागात देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. ही निवड अंतिम आहे यात बदल केला जाणार नाही.

४. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, जात, वय, ऊन्नत गटात मोडत नसणे इत्यादी बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रे हि पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व सादर न करु शकलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावेचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारीसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही हि निवड यादी तात्पुरती असुन पूर्णतः उमेदवारांची शैक्षणिक अर्हता जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होण्यासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तींचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवारांची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळुन आल्यास अथवा कागदपत्र पडताळणी करीता देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वित करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर तिसऱ्या यादीतील उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी विहीत वेळेत हजर न झाल्यास त्यापुढील प्रतिक्षा यादी कार्यन्वीत करण्यात येईल.

खालील गुणवत्ता धारक उमेदवारांची निवड सक्षम निवड समिती व कार्यकारी अभियंता, ७६५ के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग एकतुनी हे राखुन ठेवत आहेत.

१. तात्पुरत्या निवड यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषांमुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार सक्षम निवड समिती व कार्यकारी अभियंता, ७६५ के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग एकतुनी हे राखुन ठेवत आहेत.

२. निवड न झालेल्या उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे पत्र व्यवहार किंवा ई-मेलव्दारे ७६५ के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग एकतुनी या कार्यालयाकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची किंवा ई-मेलची दखल या कार्यालयाकडुन घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी

**कार्यकारी अभियंता, ७६५ के.व्ही. ग्रहण केंद्र विभाग एकतुनी या विभागात तिसऱ्या यादीत निवड झालेल्या उमेदवाराची तात्पुरती निवड यादी खाली प्रमाणे आहे.**

**PROVISIONAL SELECT LIST EWS CATEGORY**

| Sr. No. | Application Code | Candidates Name | Caste Category | Aggregate % (SSC+ITI) | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | AP0122260643 | SAYYAD MATIN PASHU | EWS | 70.04 | Selected Against EWS |

३. तात्पुरती निवड मधील उमेदवारांनी दिनांक २८/०७/२०२२ पर्यंत कार्यकारी ७६५ के.व्ही. ग्रहण केंद्र विभाग एकतुनी, गट क्रं. २६४, रोहिलागड फाटा, एकतुनी, ता पैठण, जि. औरंगाबाद या पत्यावर कार्यालीन दिवशी (शनिवार व रविवार वगळुन) सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:१५ या कार्यालीन वेळेत हजर रहावे. दिनांक २८/०७/२०२२ नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणाऱ्या उमेदवारांनी निवड रद्द करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

११. खालील प्रमाणे कागदपत्रे/ प्रमाणपत्रे सादर करणे.

- SSC Certificate ( दहावी सनद )
- ITI Marks Certificate (All Semester) / SSC Markmemo (दहावी गुणपत्रक )
- Screen shot ची प्रत.
- राखीव गटातुन उमेंदवाराने अर्ज केला असेल तर जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र.
- आर्थिक दुर्बल घटकात उमेदवार मोडत असेल तर चालु वैध प्रमाणपत्र.
- आधार कार्ड
- बॅंक पासबुक

वरील सर्व मुळ कागदपत्रे तसेच सर्व कागदपत्रांचा वरील क्रमाणे साक्षांकित १ संच

१२. कागदपत्रे पडताळणी करीता येणाऱ्या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना स्वखर्चाने पडताळणी करता उपस्थित राहावे लागेल.

( दि.मा.शेळके )
कार्यकारी अभियंता
७६५ के.व्ही.ग्र.केंद्र विभाग एकतुनी

**प्रत सविनय सादर-**
अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, महापारेषण, औरंगाबाद
.......... निवड समितीने निवड करुन दिलेल्या उमेदवारांनी निवड यादी प्रमाणे तात्पुरती निवड यादी प्रसारीत करण्यात आली आहे.